अफझलखानाचा वध



सतराव्या शतकात भारतावर सर्वत्र परकीयांचे राज्य होते. अरबस्तान, इराण, तुर्कस्थानातून आलेले आक्रमक भारतावर राज्य करत होते. त्यांना भारतीय लोक, धर्म आणि प्रथा यांच्याबद्दल राग होता. ते प्रजेशी वाईट वागत असत. भारतातील सामान्य लोकांची परिस्थिती अतिशय वाईट होती.

अशा काळात महाराष्ट्रात शिवाजी भोसले नावाच्या शूर राजाने स्वराज्य स्थापले. अनेक परकीय मुस्लिम राजांशी युद्ध करून शिवाजीने आपले राज्य वाढवायला सुरुवात केली.

महाराष्ट्राच्या दक्षिणेला विजापुरात आदिलशहाची राजधानी होती. आदिलशहाला मराठी लोकांचे स्वराज्य सहन होत नव्हते. त्याने स्वराज्याचा नाश करायचे ठरविले. शिवाजी राजांचा पराभव करायचे ठरविले. त्यासाठी त्याने एका अतिशय पराक्रमी सेनापतीला पाठविले. त्याचे नाव होते अफझलखान.

अफझलखान अतिशय शूर आणि तितकाच क्रूर सेनापती होता. तो खूप मोठे सैन्य घेऊन विजापुराहून निघाला. त्याने वाटेतील सामान्य लोकांना खूप त्रास द्यायला सुरुवात केली. देवळे फोडायला सुरुवात केली. त्याने तुळजापूर मधील भवानी मातेचे देऊळ फोडले. मजल दर मजल करत तो स्वराज्याच्या दिशेनी येऊ लागला.

शिवाजी राजे हे सर्व पाहत होते. अफझलखानाची चाल त्यांच्या लक्षात आली. शिवाजी राजांचे सैन्य मावळ्यांचे होते. मावळे सह्याद्रीच्या कुशीत राहणारे. डोंगरांमधील युद्धात ते पटाईत होते. म्हणून अफझलखान त्यांना मैदानात आणायचा प्रयत्न करत होता. पण शिवाजी राजे हुषार होते. त्यांनी आपला वकील खानाला भेटायला पाठवला. त्या वकिलाने खानाला सांगितले की शिवाजी राजे खूप घाबरले आहेत. त्यांना इथे येऊन तुम्हाला भेटायची भीती वाटत आहे. तरी खानाने सह्याद्रीच्या डोंगरात येऊन राजांना भेटावे. आपल्या स्तुतीने खुश झालेला खान त्याला तयार झाला.

प्रतापगडावर भेटीची जागा ठरली. खान आपले थोडे सैन्य घेऊन प्रतापगडाच्या पायथ्याशी आला. खान जरी भेटीसाठी आला होता, तरी त्याने शिवाजी राजांना विश्वासघाताने ठार मारायची तयारी केली होती. मात्र राजे सावध होते. त्यामुळे त्यांनी कपड्यांच्या आतून चिलखत घातले. भवानीमातेला नमस्कार करून राजे खानाच्या भेटीला निघाले.

शिवाजी राजांनी शामियान्यात प्रवेश केला. खान आधीच तिथे आलेला होता. मैत्रीचे सोंग घेऊन त्याने राजांना मिठी मारली. मिठी मारताच त्याने राजांच्या पाठीवर कट्यारीने वार केला. पण चिलखतामुळे राजे वाचले. मग मात्र त्यांनीही आपली कट्यार काढून खानाला ठार केले.

शिवाजी राजांचे सैनिक आधीच दबा धरून बसले होते. त्यांनी खानाच्या बेसावध सैन्यावर अचानक हल्ला केला. प्रचंड मोठे सैन्य घेऊन मराठी स्वराज्याला मिटवून टाकायला निघालेला अफझल खान स्वतःच मरण पावला. तसेच त्याच्या सैन्याचाही संपूर्ण पराभव झाला. शिवाजी राजांच्या सावधपणामुळे आणि हुषारीने स्वराज्यावर आलेले संकट दूर झाले.

~~~

© Triveni Marathi Shala, 2018
~~~

१. खालील शब्दांचा वापर करून वाक्ये लिहा:

परकीय, प्रथा, स्वराज्य, पटाईत, स्तुती, सावध, सोंग, संकट

२. शिवाजी राजे कसे होते? (त्यांच्यासाठी वापरलेली विशेषणे शोधून लिहा.)

३. अफझल खान कसा होता? (त्याच्यासाठी वापरलेली विशेषणे शोधून लिहा.)

४. शिवाजी राजांनी खानाला डोंगरात कसे बोलावून आणले?

५. शिवाजी राजांची एक गोष्ट वाचून वर्गात सांगणे. (Consider this as a speech competition. Prepare a story that will be delivered as a three minute speech.)

© Triveni Marathi Shala, 2018